### (पान १२ वरुन) फिशरीज हब...

१० रिटेल स्टॉल, चिल्ड रूम व आइस स्टोरेज, आइस यूनिट २० टन प्रतिदिन क्षमतेचे फिश ड्रेसिंग यूनिट, याचा प्रामुख्याने समावेश आहे. या प्रकल्पा मुळे अमरावती विभागातील गोडया पाण्यातील मासेमारी करणाऱ्या मासेमारांना मोठया प्रमाणात रोजगार मिळणार असून मत्स व्यवसायीकांद्वारे उत्पादित माशांचे मोठया प्रमाणात मुल्यवर्धन होवून बाहेरील बाजारपेठांमध्ये प्रक्रियायुक्त मासे निर्यातीस चालना मिळणार आहे. या प्रकल्पामुळे मासेमार यांचे सह मासे विक्री,मासे प्रक्रीया, वाहतुक व मत्स आधारित उद्योगामध्ये पश्चिम विदर्भा सारख्या औद्योगिक दृष्टया पिछाडीवर असलेल्या भागात मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असल्याचा सार्थ विश्वास आ.डॉ.सुनिल देशमूख यांनी व्यक्त केला आहे.

### (पान १२ वरुन) राजापेठ रेल्वे उड्डाणपुलाच्या...

लवकरात लवकर पुर्ण होऊन नागरीकांकरीता हा मार्ग खुला व्हावा या उद्देशाने आ.डॉ.सुनिल देशमुख व आ.डॉ.अनिल बोंडे यांनी शुक्रवारी या कामाची पाहणी केली.

निर्माणाधिन असलेल्या राजापेठ रेल्वे उड्डाणपुलाच्या खालून भुयारी मार्ग तयार करण्याचे काम रेल्वे विभागाकडून सुरू करण्यात आले आहे. मात्र या भुयारी मार्गाला अद्यापपपर्यंत राज्यशासनाची मान्यता प्राप्त झाली नसल्याने हे काम संथगतीने होत आहे. त्यामुळे राजापेठ रेल्वे फाटकाच्या दोन्ही बाजुच्या परिसरात राहणाऱ्या नागरीकांना रहदारी करतांना त्रास सहन करावा लागत आहे. राजापेठ रेल्वे भुयारी मार्गाबाबतचा अडथळा त्वरीत निकाली लागावा याकरीता आ.डॉ.सुनिल देशमुख यांनी नगर विकास विभागाच्या सचिवांशी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधून वस्तूस्तिथी जाणून घेतली व नागरीकांच्या समस्यांबाबत शासनाला अवगत केले. त्यावर या मुद्यावर सोमवारी मंत्रालयात बैठक बोलावून भुयारी मार्गाच्या मान्यतेबाबतचा प्रस्ताव निकाली काढण्याचे आश्वासन नगरसचिवांनी आ.डॉ.सुनिल देशमुख यांना दिलेत. झालेल्या संभाषणाची माहीती आ.डॉ.सुनिल देशमुख यांनी सदर प्रस्ताव लवकरात लवकर शासनाच्या दरबारी मंजुर होईल.त्यानंतरच्या कार्यवाहीसाठी प्रशासनाने तयार राहण्याचे निर्देश यावेळी आ.डॉ.सुनिल देशमुख यांनी मनपा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना दिलेत.तत्पुर्वी आ.डॉ.देशमुख यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांची बैठक घेवून राजापेठ रेल्वे उड्डाणपुलाबाबतची संपूर्ण माहीती जाणून घेतली. त्यानंतर प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जावून पाहणी केली.

यावेळी आ.डॉ.अनिल बोंडे, माजी महापौर विलास इंगोले, गटनेता चेतन पवार, नगरसेवक सलीम बेग, उपायुक्त महेश देशमुख, नरेंद्र वानखडे, माजी नगरसेवक तथा राजापेठ रेल्वे फाटक कृतीसमितीचे मुन्ना राठोड, नितीन मोहोड, समीर जवंजाळ, अॅड.सतिश बोरकर, चंदु पाटील, गणेश जाधव, डॉ.काकाणी, डॉ.राजेश मुंदे, डॉ.राजेंद्र अरोरा, डॉ.अशोक लांडे, डॉ.अनिल जावरकर, डॉ.पंकज बागडे, शहर अभियंता सुहास चव्हाण, अभियंता मंगेश कडू व स्थानिक नागरीक उपस्थित होते.

### (पान १२ वरुन) राजापेठ उड्डाणपुल...

आल्यास पादचाऱ्यांसाठी जागा राहत नाही. बडनेराकडे जाणारा हा पुल केवळ ७ मीटर रूंदीचा आहे. अशावेळी शंकरनगर व बेलपुरा भागाकडे उतरणारा पुल ६ मिटर रूंदीचा असणे धोकादायक आहे. पन्नास वर्षापूर्वी बांधलेला स्टेशनवरील पूल १७ मीटर रूंदीचा आहे. राजकमल चौक ते इर्वीन चौक पूल हा ११ मीटर रूंदीचा आहे. पंचवटी चौकातील एकतर्फी वाहतुक असलेला पूल देखील साडे आठ मीटर रूंदीचा आहे. परंतु शंकरनगर व बेलपुराकडे उतणारा पुल केवळ ६ मीटर रूंदीचा आहे. यामुळे या पुलाची धोकादायकता लक्षात येते. विशेष म्हणजे बेलपुरा व शंकरनगर दोन्ही भागातील नागरिकांना जाता यावे पुलाची गरज भासू नये यासाठी अंडरबायपास तयार करण्यात येत आहे. नागरिकांसाठी राजापेठ रेल्वे फाटक ओलांडण्यासाठी बायपास असतांना पुलाची गरज काय, असा प्रश्न शिवराय कुळकर्णी यांनी विचारला. सदर पुल बांधण्यात आल्यास मोठे अपघात होवून जीवितहानी होवू शकते. त्यामुळे हा पूल बांधण्यात येवू नये,असे त्यांनी म्हटले. पादचारी मार्ग असतांना या पुलाची गरज नाही. परंतु राणांचा क्रूर अट्टहास अमरावतीकरांसाठी जीवघेणे मॉडेल ठरत असल्याचा आरोप शिवराय कुळकर्णी यांनी केला.

राजापेठ उड्डाणपुल सदोष असून अमरावती-बडनेरा मार्गावरील हा पुल धोकादायक आहे. या पुलावरून जातांना वाहन चालकांना जीव मुठीत घेवून जावे लागते. सर्वात जास्त वाहतुक असलेल्या मार्गावर एवढा अरूंद पूल बांधून लोकांचे जीव टांगणीवर चढविले आहेत. शंकरनगर व बेलपुरा या दोन बाजूने पूल बांधण्यात येवू नये, या जनतेच्या मागणीस मान्य करीत पालकमंत्र्यांनी अंडरबायपासला संमती दिली. परंतु तरी देखील राणा पुल बांधण्यासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचे शिवराय कुळकर्णी म्हणाले. आगामी पन्नास वर्षानंतर शहराची लोकसंख्या, वाहतुक आदी बाबींना विचारात न घेता आमदार रवी राणा केवळ श्रेय लाटण्यासाठी उड्डाणपुलासाठी आग्रही आहेत. यासाठी त्यांनी पालकमंत्री प्रवीण पोटे विकासात आडकाठी आणत असल्याचा आरोप केला. रवी राणा निष्प्रभ आमदार असून ते श्रेयकुमारसोबतच फ्लेक्सकुमार असल्याची टिका कुळकर्णी यांनी केली. दुसऱ्यांनी केलेल्या कामावर फ्लेक्स लावण्याचा निर्लज्जपणा केवळ राणांच करू शकतात. राजापेठ उड्डाणपुलाप्रकरणी रवी राणा यांनी पालकमंत्र्यांवर केलेले आरोप म्हणजे चोरांच्या उलट्या बोंबा आहेत. अमरावती शहराचा वाढता वेग पाहता आगामी दोन चार वर्षात हा उड्डाणपुल बळी घेण्यास कारणीभूत ठरणार असल्याचे ते म्हणाले.

पत्रपरिषदेला प्रवीण कौंडण्य, नगरसेविका पद्मजा कौंडण्य,नगरसेविका अनिता राज व लखन राज उपस्थित होते.

### (पान १२ वरुन) मुख्यमंत्र्यांचे मौनत्व...

वेग येत आहे. शेतमाल खरेदीसाठी ऑनलाईन पद्धत अंमलात आणण्यात आली आहे. पद्धत चांगली असली तरी सरकारकडे यंत्रणा नाही. त्यामुळे खाजगी संस्थावर अवलंबून रहावे लागत आहे. शेतमालांचे ग्रेडशेन करण्याची सोय नाही. म्हणजेच ऑनलाईनचा निर्णय देखील सरकारच्या अंगलगट येण्याची शक्यता आहे. परंतु यातून नुकसान होईल ते शेतकऱ्यांचे हे लक्षात घेतलं पाहिजे. सरकार निर्णय घेवून त्याचे गोडवे गावू शकते. परंतु त्याच्या परिणाम व अपयशाचे वाटेकरी होण्यास तयार नाही. मुख्यमंत्र्यांनी अमरावती येथे पाळलेल्या मौनातून ही बाब पुरती स्पष्ट झाली आहे.

शेतकऱ्यांचा कर्जमाफी व पीक कर्जावरून अजूनही सावळा गोंधळ सुरुच आहे. यात भरीस भर म्हणून दिवाळीच्या तोंडावर ऑनलाईन खरेदी सुरु करण्यात आली. प्रत्यक्षात खरेदीच नाही. खरेदी सुरु करण्याचे आश्वासन मिळाले परंतु हमीभाव नाही. म्हणजेच एक प्रश्न सुटत नाही, तोच दुसरा उभा राहतो. कॉंग्रेस आंदोलन करीत असले तरी सरकारकडे उत्तर नसल्याने मुख्यमंत्र्यांचे मौनत्व आहे, हे समजून घेतलं पाहिजे. मूळात, गेल्या चार वर्षात कृषी बाबत सरकारने ठोस उपाययोजना केलेल्या नाहीत. शेतकऱ्यांना लाभ होईल, यासाठी शेतमाल खरेदीपासून ते हमीभाव देण्यापर्यत व्यवस्था परिवर्तन झाले नाही. ते होणे देखील नाही. तिजोरीत ठणठणाट आहे. सरकारजवळ धोरण, त्याची अंमलबजावणी व पैसा नसल्याने शेतीचे प्रश्न सुटण्याची शक्यता नाही. शहरी भागासाठी योजना राबविण्यासोबत विकास नांदविणाऱ्या सरकारला ग्रामीण भागातील प्रश्नांना सोडविता आले नाही. त्यामुळे मौनत्वाखेरिज उपाय नाही. निवडणूका पुढ्यात असतांना प्रश्नांना टाळणे याहून दुसरा उपाय सरकारकडे नाही, हेच यातून सिद्ध होतं.

शेवटी, सरकार भाजपचे असले तरी ते शेतकऱ्यांचे आहे. कारण २०१४ च्या निवडणूकीत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या बळावर देवेंद्र फडणवीस यांना सत्ता स्थापन करता आली. त्यांनी दिलेली आश्वासने व वारेमाप घोषणा हवेत विरल्या आहेत. भारनियमनापासून सुटका ते शेतमालास हमीभावापर्यत सारंच काही पोकळं ठरलं. त्यामुळे मुख्यमंत्री मौन आहेत. परंतु त्यांची ही चुप्पी शेतकऱ्यांसाठी अधिक क्लेषदायक आहे. राज्याच्या नेतृत्वानं मौन पाळल्याने त्यांच्याकडे आशाळभूत नजरेनं पाहणाऱ्या बळीराजाला दिलासा मिळणार नाही. म्हणूनच मुख्यमंत्री व त्यांच्या सहकाऱ्यांनी मौन सोडून प्रश्नांची सोडवणूक केली पाहिजे. मौनातून प्रश्न सुटत नाही, तर वाढतात, इतकचं.

● मो.क्र. : ९८८१३८८०७१

# संघटित ऊर्जेनेच होईल माय मराठी अभिजात : राज्यसचिव शैलेश काळे



अमरावती दि. १९ : दि.१४/१०/२०१८ ला स्थानिक युनिक एकेडेमी येथे अभिजात मराठी शिक्षक साहित्य परिषद अमरावति आयोजित काव्यमैफिल व नऊ तालुक्याचा शाखा विस्तार यशस्वीपने करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याध्यक्ष किशोर तळोकार तसेच काव्यमैफिलीचे अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक कथाकार मा विनोदजी तिरमारे होते. कार्यक्रमाला विशेष उपस्थिति जेष्ठ साहित्यिक मा.सुनीलजी यावलिकर व गजलकार चंदूभाऊ पाखरे होते.

प्रसंगी राज्यसचिव शैलेश काळे माय मराठीचे वैभव मांडत असतांना म्हणाले मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त करायचा असेल तर एक महाराष्ट्री मराठी प्रचंड संघटित ऊर्जा निर्माण कराविच लागेल. राज्याध्यक्ष मा.किशोर तळोकर यानी परिषदेची घटनात्मक बाजू स्पष्ट केली. मा.सुनीलजी यावलिकर कर यांनी दड़पनातून मुक्त होउंन लिखान करण्याचे आवाहन केले.

प्रसंगी अचलपुर, दर्यापुर, अंजनगाव, मोर्शी, वरुड, धामनगाव रेल्वे, चांदूर बाजार, येथील मोठ्या प्रमाणात असलेल्या उपस्थिति मधून सर्वानुमते कार्यकारिण्या गठित करन्यात आल्या.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात काव्यमैफिले करिता करिता जिल्हाभरातून आलेल्या साहित्यिकानी आपल्या दिलखेच रचना सादर केल्या.आपल्या अध्यक्षीय भाषानातून मा.विनोदजी तिरमारे यानी विधायक चळवळीला मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्विते साठि जिल्हाध्यक्ष संदीप देशमुख, महादेवजी निमकर, शरद राउत, कैलास कापडे, अनिल राउत,खुशाल गुल्हाने, नीलकंठ गणवीर, दिगाम्बर करड़े,पदमाकर मांडवधरे,मिलिंदजी तट्टे,राहुल मोहोड़, मनोज सपकाळ,एस पी मोहोड़,चंचल दातिर, सुनीता तायड़े, भावना कविटकर, रश्मि मुदगल, सर्व अमरावती कार्यकारिणी ने प्रयत्न केले. उत्कृष्ट संचालन सहसचिव खुशाल गुल्हाने यानी तर उपस्थितांचे आभार जिल्हाध्यक्ष संदीप देशमुख यांनी मानले.

अभिजात मराठी शिक्षक साहित्य परिषद राज्यभर मराठी भाषा प्रसार ,जतन व संवर्धन यासाठी कार्यरत आहे.मराठी माणसाला अभिव्यक्ति होण्याचे एक हक्काच व्यासपीठ महाराष्ट्रभर परिषदेने खुले केले आहे. प्रसंगी दीपा चंदेले,सुदेश कचवे, वसु मॅडम,प्रा. गजाननराव हेरोळे, सौ ममता राउत, सुनील थोरात, सागर टेवरे,प्रा. दीपक अंबरते,राहुल मापारी, संतोष भोरे,यांची उपस्थिति होती, काव्यमैफिले मध्ये असंख्य साहित्यिकानी आपल्या दर्जेदार रचना सादर करुण रसिकाना भाराऊन टाकले.

# अमृतसर रेल्वे दुर्घटना : मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची सरकारी मदत

अमृतसर दि. १९ : अमृतसर येथील चौडा बाजार परिसरात झालेल्या रेल्वे अपघातात ५० पेक्षा जास्त लोक मृत्यूमुखी पडल्याची भीती व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार दसऱ्याच्या सणानिमीत्त चौडा बाजार परिसरात रावण दहनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याचवेळी पठाणकोटवरुन अमृतसरच्या दिशेने येणारी गाडी पुतळ्याला धडकून हा मोठा अपघात घडल्याचं समोर येतंय. स्थानिक लोकांनी दिलेल्या माहितीनुसार या घटनेवेळी परिसरात २०० पेक्षा जास्त लोकांचा समुदाय हजर होता. त्यामुळे या अपघातात मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येते आहे.

दरम्यान अपघातानंतर रेल्वेचे अधिकारी, स्थानिक पोलिस व वैद्यकीय अधिकारी घटनास्खळी रवाना झाले आहेत. अपघातात जखमी लोकांना अमृतसर व नजिकच्या परिसरात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या घटनेची पंजाबचे मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांनी दखल घेतली असून, आपला नियोजीत इस्त्राईल दौरा रद्द करुन त्यांनी दिल्लीवरुन अमृतसरला जाण्याचा निर्णय घेतला आहे. याचसोबत अपघातात मृत्यूमुखी पावलेल्या मृतांच्या नातेवाईकांना सरकारतर्फे ५ लाखांची मदत घोषित करण्यात आलेली आहे. याचसोबत या अपघातात जे लोकं जखमी झाले आहेत, त्यांच्यावर सरकारी रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येणार आहेत.

# काश्मीर: ३ दहशतवादी ठार; चार एके४७ जप्त

श्रीनगर दि. १९ : बारामुल्ला जिल्ह्यातील बोनिआर परिसरात, एलओसी जवळ लपलेल्या तीन दहशतवाद्यांचा लष्कराने खात्मा केला असून त्यांच्याकडील ४ एके ४७ ही जप्त केले आहेत. दरम्यान या परिसरात लपलेल्या अजूनही काही दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे. बोनिआर परिसरात काही दहशतवादी लपले असल्याची माहिती सुरक्षा दलांना गुरुवारी संध्याकाळी मिळाली होती. त्यानुसार शुक्रवारी सकाळी लष्काराने हा परिसर घेरून एलओसी जवळ लपलेल्या तीन दहशतवाद्यांना ठार केलं. काश्मीरमध्ये आता २५० तळांवर एकूण ३०० दहशतवादी सक्रिय असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाली आहे. या दहशतवाद्यांना संपवण्यासाठी भारतीय सैनिकांनी मोहीम छेडली असून सीमेपलीकडून दहशतवादी भारतात येणार नाही याची काळजी घेतली जाते आहे.

# अवैध वृक्षतोड व हर्रास प्रकरणी डवरगाव ग्रामपंचायतच्या सरपंचास अटक

## ग्रामसेविका वनविभागाच्या रडारवर : वनविभागाची धाडसी कार्यवाही

नांदगाव पेठ दि. १९ : महसुल आणि वनविभागाची पुर्व परवानगी न घेता डवरगाव ग्रामपंचायतचे सरपंच आणि सचिव यांनी पांदण रस्त्यालगत असलेल्या दीडशे वर्ष जुने चिंचेचे वृक्ष तोडून परस्पर हर्रास केल्या प्रकरणी बुधवारी वनविभागाने धाडसी कार्यवाही करीत येथील सरपंच हरिदास गावंडे यांना अटक केली. तर सचिव के.बी. दीवे या वनविभागाच्या रडारवर आहेत. ग्रामपंचायत सदस्य जया नाकाडे व राहुल नाकाडे यांनी याबाबत पाठपुरावा करुन ही गंभीर बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणली होती. अखेर त्यांचा लढा यशस्वी ठरला.



डवरगाव येथील पांदण रस्त्यावर दोनशे वर्ष जुने चिंचेचे दहा वृक्ष होती. या झाडांवर माकडांचा वावर असल्याने आणि शेतक:यांना त्रास होत असल्याचा हवाला देत २३ डिसें. २०१५ रोजी येथील सरपंच हरिदास गावंडे आणि इतर सदस्यांनी ठराव घेऊन वृक्षतोडीचा मार्ग काढला. विशेष म्हणजे याबाबत विरोधी गटाच्या सदस्यांना कोणतीही सूचना देण्यात आली नव्हती. ग्रामपंचायतने केलेल्या ठरावानुसार सरपंच व सचिव यांनी माहुली जहागीर येथील एका लाकुड व्यापा:याला वृक्षतोडीचा कंत्राट दिला. लगेच आठ दिवसामध्ये रविवार या दिवशी सरपंच हरिदास गावंडे यांनी परस्पररित्या हर्रास घेऊन हा हर्रास ३१ हजार रुपयांना दिला. प्रत्यक्षात सर्व वृक्षांची किंमत ही तीन लाखाच्या घरात आहे. विरोधी गटाचे सदस्य जया नाकाडे व राहुल नाकाडे यांनी ग्रामसेविका दिवे यांना याबाबत माहीती मागितली तेव्हा दिवे यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. वृक्षतोडीची परवानगी असल्याबाबतचे दस्तावेज दाखविण्याची मागणी विरोधी सदस्यांनी केल्यानंतर ग्रामसेवक दीवे यांनी सर्व परवानग्या असल्याचे तोंडी उत्तर सदस्यांना दिले. परंतु या उत्तरामुळे सदस्यांचे समाधान न झाल्याने अखेर जया नाकाडे यांनी ग्रामपंचायतला माहितीचा अधिकाराअंतर्गत माहिती मागितली. त्यानंतर खरे प्रकरण उजेडात आले. सतत तीन वर्ष पाठपुरावा केल्यानंतर वनविभागाने याबाबत कार्यवाहीचे पाऊल उचलले. बुधवारी धाडसी कार्यवाही करत येथील सरपंच हरिदास गावंडे यांना तातडीने अटक करुन ग्रामसेवक दिवे यांना अटक करण्याच्या हालचाली सुरु आहे. अवैध वृक्षतोड करणा:या सरपंच हरिदास गावंडे, ग्रामसेवक के.बी.दीवे यांच्यावर महाराष्ट्र वननियमावली कायदा २०१४ अंतर्गत ३१,४७,८२ डॅमेज टू प्रॉपर्टी अॅक्ट तसेच भादंवी कलम ३,३४,१०७,१०९,११६,१९८, १२० ब १६६, १६८, १६९, २०१, ३७९, ३८१, ४०५, ४०९, ४१०, ४२०, ४६३, ४६५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक उपवनसंरक्षक वाघमोडे,उपवनसंरक्षक अशोक कविटकर, राजेंद्र बोंडे, यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी धंदर, सुरटणे व काळे हे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

**डवरगावला शासनाचा पर्यावरण पुरस्कार**

डवरगाव ग्रामपंचायतला २०१३ साली शासनाचा दीड लक्ष रुपयांच्या पारितोषिकासह पर्यावरण पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे. असे असताना देखील सरपंच आणि सचिवाने पर्यावरणाचा विचार न करता वैयक्तीक स्वार्थासाठी लढविलेली वृक्षतोडीची शक्कल जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

**नेत्यांकरवी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न**

सरपंच हरिदास गावंडे यांना अवैध वृक्षतोड प्रकरणात अटक झाल्यानंतर दुस-या दिवशी त्यांना जमानत सुध्दा मिळाली. मात्र त्यानंतर या प्रकरणाला राजकीय रंग देऊन नेत्यांकरवी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे बोलल्या जात आहे. वनविभागाच्या अधिका:यांना नेत्यांचे फोन जात असल्याने नेमके या प्रकरणाला कोणते वळण मिळेल याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मीटू चा गैरवापर नको: हायकोर्ट

मुंबई दि. १९ : 'मी टू' ही मोहीम पीडित महिलांसाठी आहे. हा विषय संवेदनशील आहे. याचा कोणीही गैरवापर करू नये. पीडित महिलांच्या खांद्यावर बंदूक ठेवून इतरांनी आरोपबाजी करू नये, असे स्पष्ट मत आज मुंबई हायकोर्टाने नोंदवले.

'मी टू'च्या निमित्ताने समोर आलेल्या प्रकरणांसाठी पुरुष व महिलांची समिती स्थापन करायला हवी, असे मतही हायकोर्टाने यावेळी व्यक्त केले.

दिग्दर्शक विकास बेहल विरोधात फँटम फिल्म्सच्या एका माजी कर्मचारी महिलेने लैंगिक अत्याचाराचा आरोप केला होता. त्यानंतर फँटम फिल्म्समध्ये विकास बेहलसोबत पार्टनर असलेले दिग्दर्शक अनुराग कश्यप व विक्रमादित्य मोटवाने यांनी पीडित मुलीच्या समर्थनार्थ विधाने केली होती. त्यामुळे बेहल यांनी अनुराग कश्यप व अन्य काहींविरुद्ध दहा कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. त्यावर आज न्या. एस. जे. काथावाला यांच्या चेंबरमध्ये सुनावणी झाली. तेव्हा कोर्टाने हे मत नोंदवले.

**पीडितेचे म्हणणे ऐकले**

सुनावणीच्या वेळी पीडित मुलीचेही म्हणणे न्यायमूर्तींनी ऐकून घेतले. 'मी आधीच खूप सहन केले आहे आणि आताही त्रास सहन करत आहे. त्यामुळे मला कायदेशीर प्रक्रियेत अडकायचे नाही. मला माझ्यावरील अत्याचाराप्रकरणी कायदेशीर प्रक्रिया करायची नाही', असे म्हणणे या मुलीने तिच्या वकिलांमार्फत मांडले.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

### (पान १ वरुन) दुष्काळात महाराष्ट्राला...

मोदी म्हणाले.

घरकुल योजनेच्या अंमलबजावणीचाही पंतप्रधानांनी यावेळी आढावा घेतला. घर देण्याचे प्रयत्न यापूर्वी सुद्धा झाले. अनेक योजना होत्या. मात्र, गरिबांना सशक्त करण्याऐवजी एका कुटुंबाचा उदो उदो करण्यात हेतू त्यामागे होता. व्होट बँक तयार करण्याचा उद्देश होता, असं म्हणत मोदींनी कॉंग्रेसवर अप्रत्यक्षपणे टीका केली. गेल्या चार वर्षांत भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने १ कोटी २५ लाख घरे बांधली आहेत. कॉंग्रेसच्या सरकारला हे काम करण्यासाठी २० वर्षे लागली असती, असं सांगून, सेवेची भावना मनात असली की काम वेगाने होते,' असा टोला त्यांनी हाणला. 'आयुषमान भारत' योजनेचा आतापर्यंत १ लाख लोकांनी लाभ घेतला आहे. याच योजनेतून नवीन रुग्णालय उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे,' असंही त्यांनी सांगितलं.

### (पान १२ वरुन) मनपाची अभ्यासीका...

मुबलकप्रमाणात उपलब्ध आहे. तसेच इतर आवश्यक सोयी सुविधादेखील पुरविण्याकरीता महापालिका प्रशासन विशेष प्रयत्न करीत आहेत. विद्यार्थ्यांना अधिकाधिक सोयी पुरविण्याकरीता मनपा आयुक्त संजय निपाणे यांचे विशेष लक्ष आहे. उपलब्ध क्षमतेपेक्षा विद्यार्थ्यांची प्रवेशाकरीता मागणी असल्याने शेकडो विद्यार्थी प्रतिक्षेत आहेत.

यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे विभागप्रमुख उपायुक्त नरेंद्र वानखडे तसेच शिक्षणाधिकारी अनिल कोल्हे यांनी रोप देवून अभिनंदन केले. यावेळी अमोल साकुरे यांच्यासह विभागातील अन्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साईबाबांच्या शिर्डीत पंतप्रधान खोटे बोलले: कॉंग्रेस

मुंबई दि. १९ : 'खोटे बोलण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हात कोणी धरू शकत नाही, हे देशातील जनतेला माहित आहे. मात्र आता साईबाबांच्या शिर्डीत येऊन पंतप्रधान खोटे बोलले याचे दु:ख माझ्यासारख्या साईभक्तांना झाले', असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खासदार अशोक चव्हाण यांनी केले.



यूपीए सरकारने चार वर्षाच्या काळात २५ लाख घरे बांधली व तेवढ्याच कालावधीत एनडीए सरकारने १ कोटी २५ लाख घरे बांधल्याचा खोटा दावा करून पंतप्रधानांनी देशातील जनतेची दिशाभूल केली आहे, असा आरोप करताना २००४ ते २०१३ या यूपीए सरकारच्या कालावधीत इंदिरा आवास योजनेअंतर्गत २ कोटी २४ लाख ३७ हजार घरे बांधण्यात आली. म्हणजेच यूपीए सरकारच्या काळात प्रतिवर्ष २५ लाख घरे बांधून पूर्ण केली. मोदी सरकारने पंतप्रधान आवास योजनेचे दिलेले उद्दिष्ट्य अद्याप पूर्ण करता आले नाही. हे त्यांच्या सरकारने दिलेल्या आकडेवारीवरूनच सिद्ध झाले आहे, असे चव्हाण यांनी नमूद केले.

यूपीए सरकारच्या काळात २०१३ मध्ये राजीव आवास योजना कार्यान्वित झाली. या योजने अंतर्गत एका वर्षात १.१७ लाख घरे बांधण्यात आली. मोदी सरकारने या योजनेचे नाव बदलून सरदार पटेल राष्ट्रीय शहरी गृहनिर्माण मिशन केले व २०२२ पर्यंत दोन कोटी घरे बांधण्याचे आश्वासन दिले. पण प्रत्यक्षात १० जुलै २०१७ पर्यत फक्त १.३३ लाख घरे बांधली. २००८ ते २०१३ या काळात यूपीए सरकारने १ कोटी २८ लाख ९२ हजार घरे बांधून पूर्ण केल्याचे २०१४ च्या कॅगच्या अहवालात नमूद केले आहे. तरीही शिर्डीसारख्या पवित्र ठिकाणी येऊन पंतप्रधान खोटे बोलत आहेत. आता साईबाबांनीच पंतप्रधानांना खरे बोलण्याची सद्बुद्धी द्यावी, अशी प्रार्थना आपण साईबाबांना करणार असल्याचा टोला कॉंग्रेस प्रदेशाध्यक्षांनी लगावला.

# वृत्तपत्र विकता-विकता घडलो : हेमंत निखाडे

## राजर्षी शाहू महाराज वाचनालयात वृत्तपत्र विक्रेता व पत्रकारांचा गौरव

तिवसा दि.१९ : आधुनिक युगात वृत्तपत्राचे महत्व आजही कायम आहे.गेल्या १४ वर्षापासून स्वतः गुरुकुंज, मोझरी ते आज तिवसा असा वृत्तपत्र वाचकांच्या घरोघरी पोहचविण्याचा निरंतर प्रवास सुरु असून त्यामुळेच आपण आज वाचकांना सेवा देत घडलो तसेच पत्रकारितेत शासनाच्या विविध पुरस्कारांनी सन्मानित सुद्धा झालो असल्याचे प्रतिपादन तिवसा येथील वृत्तपत्र विक्रेते तथा पत्रकार हेमंत निखाडे यांनी बुधवार(ता.१७) रोजी तिवसा येथे केले.



स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय संस्थेअंतर्गत राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून वाचन प्रेरणा दिन व वृत्तपत्र विक्रेता दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.त्यानिमित्त वृत्तपत्र विक्रेता ते पत्रकार म्हणून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल हेमंत निखाडे यांचा शाल,श्रीफळ,भेटवस्तू देवून यथोचित सत्कार करण्यात आला.सोबतच युवा पत्रकार म्हणून सूरज दाहाट तर जेष्ठ पत्रकार म्हणून जानराव मनोहर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वाचनालयाचे राहुल धडांगे,सुमित अनासाने,दिपक धानोरकर,प्रविण राऊत,संजय वाट,राजाभाऊ देशमुख व विद्यार्थी रोशन राऊत,विनय चव्हाण,प्रविण गंधरे,अवधूत अढाऊ,अंकुश लांडे,अंकुश नांदूरकर,चेतन लाकडे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन प्रविण राऊत यांनी केले.

आर.एन.आय.क्र.११४२०/५७/रजि/क्र.एन.आर./ए.टी.आय./८५/२००३, हे पत्र श्रम प्रतिष्ठान (भागिदारी संस्था) चे करीता हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक उल्हास बा. मराठे यांनी हिंदुस्थान ग्राफीस अँड प्रिंटर्स, सहकारी औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती येथे छापून दै. हिंदुस्थान कार्यालय, खापर्डे बगीचा, अमरावती येथे प्रसिद्ध केले. ● प्रबंध संपादक – विलास अ.मराठे ● संपादक– उल्हास बा. मराठे ● मालक – श्रम प्रतिष्ठान, अमरावती ●दुरध्वनी क्र २६६०४२९,२६६६४६४,२६६००६७, २६६०५७६,२६६२७४५ ● फॅक्स क्र.–०७२१–२६६३३६०, २६६०५७६ ● यवतमाळ कार्यालय :दै. हिंदुस्थान, स्टेशन रोड, यवतमाळ फोन नं. : २३९६४८/२४३०१६/२४५०३८ ● आवृत्ती संपादक : विलास अ.मराठे ● अकोला कार्यालय : २/९, व्ही.एच.बी. कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला फोन : २४५९५८०/२४५१६९३ ● अकोला आवृत्ती संपादक : उल्हास बा.मराठे ● वाशिम कार्यालय : दै. हिंदुस्थान कार्यालय महात्मा फुले भाजी मार्केट वाशिम, फोन २३५९१५/२३३२१५ ● बुलडाणा कार्यालय : दै. हिंदुस्थान कार्यालय, सुवर्णनगर,बुलडाणा. फोन २४६०८९ ● आवृत्ती संपादक – डॉ.प्रमोद अ. मराठे मोबाईल नं. ९४२२८८०४८९ ● मुंबई कार्यालय : रविंद्र बी. खांडेकर ११०,बिरीया हाऊस, फोर्ट, मुंबई मोनं.०९२२४६८८७८८/ ०९९६७२०३१६२ फोन नं. ऑफिस : ०२२–२२६१२९११ निवास : ०२२–२२०९६७४० ●पुणे कार्यालय : नरेंद्र शिंदे, भार्गव अपार्टमेंट, एफ–४, दुसरा माळा, ३४३–बी, शनिवार पेठ, पुणे – ३० फोन : ऑ.२४४९१०६०, मो.९८२३०४६५२२ पी.आर.बी.कायद्यानुसार जिल्हा प्रमुख व संबंधीत बातमी देणारा जबाबदार सर्व वाद अमरावती न्यायालयांतर्गत